The Bhabha Atomic Research Centre
Employees' Co-op. Credit Society Ltd., Mumbai
(Registration No. 29770)

Ref. No. : BARC / CS / 09 ISO 9001:2015 Certified Date :

12 मार्च 2021

# अधिसूचना

दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासदांना या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आपल्या पतसंस्थेच्या अधिमंडळाची **59वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. 27 मार्च 2021 रोजी सकाळी 11.00 वाजता** खालील कामकाजासाठी **ऑनलाईन** आयोजित केलेली आहे व त्याचे कामकाज Unified Collaboration Services LLP यांचे कॉन्फरन्स रूममधून दृक-श्राव्य (Audio-Video Conferencing) पध्दतीने https://webcastlive.co.in/59AGM-barc-eccs/ या लिंकद्वारे International Infotech Park, वाशी नवी मुंबई येथून **सकाळी 10.45 पासून** प्रसारीत केले जाईल.

**सभेपुढील विषय:**

1. दि.19 ऑगस्ट 2019 रोजी झालेल्या 58व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2. 1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2020 या कालावधीचा वार्षिक अहवाल, शासकीय वैधानिक लेखापरीक्षित ताळेबंद, नफा-तोटा पत्रक स्वीकारुन त्यास मंजुरी देणे.
3. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे तसेच सन 2020-2021 या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
4. शासकीय लेखापरीक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक यांचा सन 2019-2020 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.
5. सन 2020-2021 या आर्थिक वर्षासाठी नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरीक्षक यांच्या नियुक्तीस मान्यता देणे.
6. सन 2018-2019 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची व त्यासंबंधीच्या दोष दुरुस्ती अहवालाची (compliance report) नोंद घेणे.
7. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस (परिशिष्ट 'अ' मध्ये दिल्याप्रमाणे) मंजुरी देणे.
8. अधिमंडळाच्या 59व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
9. माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांबाबत विचार करणे.

कृपया सर्व सभासदांनी सभेस आपली ऑनलाईन उपस्थिती नोंदवावी व ऑनलाईन सभा सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती. ऑनलाईन एजीएममध्ये सहभागी होण्यासाठी कृपया पुढील पानावरील सूचना वाचाव्यात.

THE B.A.R.C. EMPL. CO-OP. CR. SOC. LTD. ★ Reg. No. 29770 OF 30-11-61

(संजय आर. गावंडे)
मानद सचिव
संचालक मंडळाकरिता

दिनांकः 12 मार्च 2021
मुंबई 400 085

**दि. 27.03.2021 रोजी होणाऱ्या 59 व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेत सहभागी होण्यासाठी सूचना:**

- ज्या सभासदांनी रजिस्ट्रेशन केले आहे त्यांना सभेची लिंक https://webcastlive.co.in/59AGM-barc-eccs/ ओपन करून सकाळी 10.45 पासून सभा संपेपर्यत सभेत सहभागी होता येईल. व सकाळी ठीक 11.00 वाजता ऑनलाईन सभा सुरु होईल.
- ऑनलाइन वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होण्यासाठी सभासदांकडे 4G किंवा Wi-Fi internet connectivity असणे आवश्यक आहे.
- सकाळी 11.00 वाजेपर्यंत आवश्यक गणसंख्या उपस्थिती आढळून आली नाही तर ऑनलाईन सभा स्थगित केली जाईल व अशी स्थगित ऑनलाईन सभा त्याच दिवशी सकाळी 11.30 वाजता गणपूर्तीशिवाय घेतली जाईल आणि त्यात घेतलेले निर्णय सर्व सभासदांना बंधनकारक राहतील.
- ज्यावेळी मतदानाची आवश्यकता भासेल त्यावेळी Webcasting या पोर्टलवर जाऊन मतदान करता येईल. जे सभासद Zoom या App द्वारे सहभागी झाले असतील त्यांनी प्रथम Zoom या Appमधून logout करावे व Webcasting मध्ये login करून त्यांना मतदान करता येईल.
- सभेच्या विषय पत्रिकेतील विषयास अनुसरून सभासदांना काही माहिती हवी असेल किंवा सूचना, प्रश्न सभेपुढे ठेवावयाचे असतील तर त्यांनी त्याबाबतची सूचना इ-मेलद्वारे दि.22 मार्च 2021 दुपारी 1.00 वाजेपर्यंत पाठवाव्यात.
- 58व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तान्त व 59वा वार्षिक अहवाल याच्या प्रती संस्थेच्या वेबसाईटवर (www.barc-ecs.com) व कार्यालयात दि. 15 मार्च 2021 पासून उपलब्ध होतील.
- ज्या सभासदांनी 59 व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेसाठी नोंदणी केली असेल त्याच सभासदांना कुपन दिले जाईल.

**59 व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेत सहभागी होण्याकरिता करावी लागणारी प्रक्रिया:**

- सभासदांना त्यांच्या मोबाइल नंबर / ईमेलवर ऑनलाईन सभेत सहभागी होण्याची लिंक मिळेल. सभासदांना त्या लिंकवर क्लिक करावे लागेल व लॉगिन करण्यासाठी त्यांचा सदस्यता क्रमांक प्रविष्ट करावा लागेल आणि वेबकास्टिंग / झूम App द्वारे ऑनलाईन सभेत सहभागी होता येईल.
- वेबकास्टिंग लिंकद्वारे कनेक्ट केलेल्या सभासदास द्विमार्ग संप्रेषणाद्वारे जोडण्यासाठी झूम मीटिंग लिंक देखील असेल. (यासाठी सदस्यांना त्यांच्या संगणकावर / मोबाइलवर झूम App डाउनलोड आणि स्थापित करावा लागेल). सभासदांना काही प्रश्न असल्यास त्याना झूम पर्यायावर हात उंचवावा लागेल व सभेच्या अध्यक्षांच्या मान्यतेने, तो / ती unmute होईल आण मग तो / ती प्रश्न विचारू शकेल.

**दि.20.03.2021 ते 25.03.2021 पर्यंत 59 वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेकरीता**

- ज्या सभासदांनी यापूर्वीच 12.03.2021 पर्यंत प्रत्यक्ष किंवा ईमेलद्वारे नोंदणी केली असेल त्यांना पुन्हा ऑनलाईन नोंदणी करण्याची गरज नाही.
- ज्या सभासदांनी 12.03.2021 पर्यंत नोंदणी केलेली नाही ते https://webcastlive.co.in/59AGM-barc-eccs/ या लिंकवर जाऊन 20.03.2021 ते 25.03.2021 पर्यंत व्यक्तीगत ऑनलाईन नोंदणी करू शकतात.
- सभासदांना संस्थेच्या https://www.barc-ecs.com या वेबसाईटवर संगणक क्रमांकाच्या आधारे त्यांचा सभासद क्रमांक पहाता येईल.

***WITH A REQUEST TO PERMIT TO DISPLAY ON BTS & NOTICEBOARD OF BARC***

**CAO (A) BARC**

THE B.A.R.C. EMPL. CO-OP. CR. SOC. LTD. ★ Reg. No. 29770 OF 30-11-61